सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. ५ जुलै २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## सराईत गुन्हेगार जिल्ह्यातून तडीपार

प्रतिनिधी ५ जुलै

**यवतमाळ** : अवधूतवाडी पोलिसांच्या प्रस्तावानुसार दर्शन उर्फ भिंगोटी राजू ढोरे (वय २३, रा. तलाव फैल, सध्या मुक्काम शिंदेनगर, यवतमाळ) याला सहा महिन्यांसाठी यवतमाळ जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले आहे.

दर्शन ढोरे याच्या विरोधात विविध गुन्ह्यांची नोंद असल्याने सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने अवधूतवाडी पोलिस ठाण्याने त्याच्या तडीपारीचा प्रस्ताव तयार करून उपविभागीय दंडाधिकारी (एसडीएम) यांच्याकडे सादर केला होता. प्रस्तावाची छाननी केल्यानंतर माननीय एसडीएम यांनी तो मंजूर केला.

यानुसार, दर्शन उर्फ भिंगोटी ढोरे याला पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी यवतमाळ जिल्ह्याच्या हद्दीतून तडीपार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. संबंधित आदेशाचे पालन करण्याची जबाबदारी अवधूतवाडी पोलिसांकडे सोपविण्यात आली असून, आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितावर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# लोकप्रतिनिधींनाही हवा न्याय '; 446 नगरसेवक येणार एकाच व्यासपीठावर!

प्रतिनिधी ५ जुले

### 'पक्ष वेगळे, प्रश्न एकच'; हक्कांसाठी लढा देणार

**यवतमाळ** : स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नगरसेवकांच्या प्रलंबित प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि न्याय्य हक्कांसाठी संघटित लढा उभारण्याच्या उद्देशाने यवतमाळ जिल्ह्यातील सर्व पक्षीय ४४६ नगरसेवकांना एकाच व्यासपीठावर आणण्याचा महत्त्वपूर्ण पुढाकार 'यवतमाळ जिल्हा नगरसेवक समन्वय मंचा'ने घेतला आहे. या पार्श्वभूमीवर सोमवारी (दि. ६) दुपारी १२ वाजता शासकीय विश्रामगृह येथे जिल्हास्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले असून, मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

नागरिक आणि प्रशासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून नगरसेवक काम करीत असतात. आपल्या प्रभागातील पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, वीज, आरोग्य आणि विविध विकासकामांबाबत नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात. मात्र, त्यांच्या मानधन, सुविधा, अधिकार आणि विकास निधीशी संबंधित अनेक प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याची भावना नगरसेवकांमध्ये आहे.

या पार्श्वभूमीवर पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन सर्व नगरसेवकांनी एकत्र येऊन आपल्या न्याय्य मागण्यांसाठी संघटित लढा उभारण्याची वेळ आल्याचे समन्वय मंचाच्या वतीने सांगण्यात आले आहे. आगामी बैठकीत या सर्व प्रश्नांवर सविस्तर चर्चा करून पुढील आंदोलनाची दिशा निश्चित केली जाणार आहे.

विधानसभेचे पावसाळी अधिवेशन सुरू असल्याने मुख्यमंत्री तसेच नगरविकास मंत्र्यांना निवेदन सादर करण्याबाबतही या बैठकीत निर्णय घेतला जाणार आहे. नगरसेवकांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी एकमुखी भूमिका घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

समन्वय मंचाच्या वतीने शासनाकडे काही प्रमुख मागण्या मांडण्यात येणार आहेत. त्यामध्ये सर्व नगरसेवकांना किमान १५ हजार रुपये मासिक मानधन मंजूर करणे, शेतकरी कर्जमाफी योजनांमधून नगरसेवकांना वगळण्याच्या निर्णयाचा फेरविचार करणे, सर्व नगरसेवकांना टोलमुक्त प्रवास सुविधा उपलब्ध करून देणे, प्रत्येक नगरसेवकाला वार्षिक ५० लाख रुपयांचा समान विकास निधी देणे आणि १० लाख रुपयांचा वैद्यकीय विमा लागू करणे या मागण्यांचा समावेश आहे. याशिवाय नगरसेवकांचे अधिकार, सन्मान आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी आवश्यक निर्णय तातडीने घेण्याची मागणीही करण्यात येणार आहे.

विशेष म्हणजे, ६ जुलै रोजी लोकशाही दिन असल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातील सर्व विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे बैठकीला उपस्थित राहणाऱ्या नगरसेवकांना त्यांच्या प्रभागांशी संबंधित प्रलंबित कामांचा पाठपुरावाही करता येणार आहे. यामुळे बैठकीला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद आणि नगरपंचायतींमधील नगरसेवकांनी या बैठकीला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, तसेच नगरसेवक समन्वय गटात सहभागी होऊन इतर सहकारी नगरसेवकांनाही जोडावे, असे आवाहन समन्वय मंचाच्या वतीने करण्यात आले आहे. 'पक्षभेद नाही, हक्कांसाठी एकजूट' या भूमिकेतून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सन्मानासाठी आणि नगरसेवकांच्या न्याय्य हक्कांसाठी एकत्रितपणे लढा उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

## तलवार घेऊन फिरणाऱ्या युवकाला बेड्या

प्रतिनिधी ५ जुलै



**पुसद** : शहरातील गुन्हेगारी प्रवृत्तीवर आळा घालण्यासाठी पुसद शहर पोलिसांनी धडक कारवाई करत तलवार घेऊन संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या एका युवकाला ताब्यात घेतले. त्याच्याकडून सुमारे तीन हजार रुपये किमतीची धारदार तलवार जप्त करण्यात आली असून, त्याच्याविरुद्ध शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुसद शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार सेवानंद वानखडे यांच्या आदेशानुसार डी.बी. पथक शहरात गस्त घालत असताना, ३ जुलै रोजी गोपनीय माहिती प्राप्त झाली. श्रीरामपूर येथील जिजामाता मंगल कार्यालयाजवळील मैदानात एक युवक हातात तलवार घेऊन फिरत असून तो घातपात करण्याच्या तयारीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. माहितीची गंभीर दखल घेत डी.बी. पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत सापळा रचला. यावेळी गजानन शंकर काळे (वय २४, रा. गुणवंतराव शाळेजवळ, श्रीरामपूर, पुसद) याला ताब्यात घेण्यात आले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडून ३४ इंच लांबीची धारदार तलवार जप्त करण्यात आली. या तलवारीची किंमत सुमारे तीन हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणी आरोपीविरुद्ध पुसद शहर पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियम, १९५९ च्या कलम ४ व २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास डी.बी. पथक करीत आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात व उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार सेवानंद वानखडे यांच्या सूचनेनुसार करण्यात आली. डी.बी. प्रमुख पोउपनि अक्षय सनगर, पोलीस हवालदार मनोज कदम तसेच पोलीस कॉन्स्टेबल शुद्धोधन भगत, सचिन राऊत व आकाश बाभुळकर यांनी ही कारवाई यशस्वी केली.

## शिवसेना संघटन बळकटीसाठी पदाधिकाऱ्यांचा निर्धार

### ढाणकीतील बैठकीत 'गाव तिथे शाखा, घर तिथे शिवसैनिक' संकल्पावर चर्चा

प्रतिनिधी ५ जुलै



**उमरखेड** : तालुक्यातील ढाणकी येथे उपनगराध्यक्ष दत्त दिगंबर वानखेडे यांच्या निवासस्थानी शिवसेना पदाधिकाऱ्यांची बैठक उत्साहात पार पडली. तालुकाप्रमुखांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत संघटन अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. तसेच, काँग्रेसमधून शिवसेनेत प्रवेश केलेल्या साहेबराव कांबळे यांचा सत्कार करण्यात आला.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत '८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण' या तत्त्वावर काम करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. 'गाव तिथे शाखा, घर तिथे शिवसैनिक' हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी तालुकाप्रमुख प्रवीण पाटील मिराशे, उपनगराध्यक्ष दत्त दिगंबर वानखेडे, नगरसेवक प्रफुल चोरे, विशाल नरवाडे तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते.

बाळासाहेब ठाकरे यांनी दिलेला स्वाभिमान आणि जनसेवेचा विचार, धर्मवीर आनंद दिघे यांनी जपलेली निष्ठा व कार्यकर्त्यांप्रती असलेले प्रेम तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विकासाभिमुख नेतृत्वातून प्रेरणा घेत शिवसेनेचे संघटन अधिक सक्षम करण्याचा निर्धार पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. तळागाळातील कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर आणि सुशिक्षित बेरोजगारांच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम करण्याची भूमिका यावेळी मांडण्यात आली. संघटन मजबूत झाल्यास जनतेचा विश्वास अधिक दृढ होईल, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## आकोलीत नाल्या तुंबल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात

### आंदोलनाचा इशारा ; हिवताप, डेंग्यू, मलेरियाची भीती

प्रतिनिधी ५ जुलै



**उमरखेड** : तालुक्यातील ढाणकी ग्रामपंचायत आकोली अंतर्गत येणाऱ्या तीन प्रभागांतील नाल्यांची गेल्या अनेक दिवसांपासून स्वच्छता न झाल्याने गावात गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. साचलेल्या सांडपाण्यामुळे नागरिकांच्या घरात दुर्गंधीयुक्त पाणी घुसत असून, हिवताप, डेंग्यू, मलेरिया यांसारख्या साथीच्या आजारांची भीती वाढली आहे. या समस्येकडे ग्रामपंचायत प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी स्थानिक नागरिकांनी थेट आंदोलनाचा इशारा दिला आहे.

चालू वर्षात आकोली ग्रामपंचायतीने तिन्ही वॉर्डांतील नाल्यांची कोणत्याही प्रकारची साफसफाई केलेली नाही, असा थेट आरोप स्थानिक रहिवासी अनिल बजरंग राठोड यांनी केला आहे. पावसाळा आणि दमट वातावरणामुळे या उघड्या व साचलेल्या नाल्यांमध्ये डासांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले असून, लहान मुले आणि वृद्धांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

या संदर्भात सजग नागरिक अनिल बजरंग राठोड यांनी ग्रामपंचायत सचिव, आकोली यांना लेखी निवेदन सादर केले आहे.

या निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, नाल्या तुंबल्यामुळे नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. जर ग्रामपंचायत प्रशासनाने तिन्ही वॉर्डांतील सर्व नाल्यांची तात्काळ साफसफाई करून दिली नाही, तर थेट ग्रामपंचायत कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

या निवेदनाची प्रत ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी स्वीकारली असून, आता प्रशासन यावर काय पावले उचलते याकडे संपूर्ण गावाचे लक्ष लागले आहे. ऐन आजारपणाच्या दिवसांत ग्रामपंचायत तात्काळ स्वच्छता मोहीम राबवून नागरिकांना दिलासा देणार की आंदोलनाची वाट पाहणार, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

## डॉ. सतीश चिद्दरवार यांना 'जीवन गौरव' पुरस्कार

प्रतिनिधी ५ जुलै



**पुसद** : वैद्यकीय सेवेसह शिक्षण, सामाजिक कार्य आणि बांधकाम क्षेत्रात चार दशकांहून अधिक काळ उल्लेखनीय योगदान देणारे ज्येष्ठ चिकित्सक डॉ. सतीश चिद्दरवार यांना राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त पुसद वैद्यकीय संघटनेच्या वतीने 'जीवन गौरव पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या वेळी त्यांच्या समवेत सौ. डॉ. सुप्रिया सतीश चिद्दरवार यांचाही सपत्नीक गौरव करण्यात आला.

पुसद वैद्यकीय संघटनेच्या आयएमए हॉलमध्ये आयोजित कार्यक्रमात संघटनेचे अध्यक्ष डॉ. यादराव सूर्यवंशी, डॉ. अविनाश जाधव, डॉ. वीरेंद्र पापळकर, डॉ. सुरेंद्र बिलोलीकर, डॉ. संजय अग्रवाल, डॉ. संजय भांगडे, डॉ. राजेश चव्हाण, डॉ. राजेंद्र जाजू यांच्यासह शहरातील अनेक मान्यवर डॉक्टर उपस्थित होते.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर बोलताना डॉ. सतीश चिद्दरवार म्हणाले, "हा केवळ पुरस्कार नसून जनसेवेच्या अखंड प्रवासाला मिळालेली प्रेरणा आहे. समाजाने माझ्यावर दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी अखेरच्या श्वासापर्यंत रुग्णसेवा व समाजसेवा करत राहीन."

डॉ. चिद्दरवार यांना यापूर्वीही विविध प्रतिष्ठेचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. आर्य वैश्य समाज डॉक्टर असोसिएशनचा 'सुश्रुत जीवन गौरव' पुरस्कारही त्यांना मिळाला आहे. तसेच पोहरादेवी येथे आयोजित गोर बंजारा एकता संमेलनात विशेष सन्मान पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला होता. मेडिकेअर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, ज्योतिर्गमय इंग्लिश स्कूल आणि मेडिकेअर कॉलेज ऑफ नर्सिंग या संस्थांच्या माध्यमातून त्यांनी वैद्यकीय व शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. नर्सिंग शिक्षणाला चालना देतानाच त्यांनी बांधकाम क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी केली. नागपूर येथे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ९०० हून अधिक मध्यमवर्गीय कुटुंबांची घरांची स्वप्ने साकार करणारा प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण केला. तसेच आर्य वैश्य समाजाच्या मंगलकार्यासाठी तीन एकर जागा उपलब्ध करून देत सामाजिक बांधिलकीही जपली. वैद्यकीय सेवा, शिक्षण, सामाजिक कार्य आणि विकासकामांचा समन्वय साधत समाजासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या डॉ. सतीश चिद्दरवार यांच्या कार्याचा गौरव म्हणून प्रदान करण्यात आलेला 'जीवन गौरव' पुरस्कार हा पुसदसाठीही अभिमानाचा क्षण ठरल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

## सुकळीत लोकसहभागातून हरित उपक्रम; वृक्षसंवर्धनाचा घेतला संकल्प



प्रतिनिधी ५ जुलै

**आर्णी** : पर्यावरण संवर्धनासाठी लोकसहभाग महत्त्वाचा असल्याचा संदेश देत सुकळी येथे ग्रामस्थ, महिला, युवक, विद्यार्थी, शेतकरी आणि सामाजिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपणाचा उपक्रम उत्साहात पार पडला. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या उपक्रमातून 'झाडे लावा, झाडे जगवा'चा संकल्प करण्यात आला.

वाढते प्रदूषण, जंगलतोड आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर वृक्ष लागवडीचे महत्त्व अधोरेखित करत विकासगंगा समाजसेवी संस्था आणि ग्रामस्थांच्या पुढाकारातून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. शुद्ध हवा, पावसाचे संतुलन, मृदासंवर्धन आणि जैवविविधतेचे रक्षण यासाठी प्रत्येकाने 'एक व्यक्ती – एक वृक्ष' हा संकल्प स्वीकारावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

या कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी होवाळे, नायब तहसीलदार डॉ. आदमुलवाड, मंडळ अधिकारी वांझाळ, तलाठी मेश्राम, तलाठी बागुल, मुख्याध्यापक राठोड व शिक्षकवृंद उपस्थित होते. तसेच सामाजिक कार्यकर्ते गजेन्द्र जाधव, किरण राठोड, किरण कैलास राठोड, गोपाल राठोड, सुनील राठोड, प्रदीप पवार, तुषार जाधव, संजय नरसिंग राठोड, गणेश बोइनवाड, संजय ढोले, अविनाश राठोड, ललिता जाधव, सुषमा किनकर, यश राठोड, प्रणव राठोड, मिथुन राठोड, अंगणवाडी सेविका, मदतनीस, ग्रामपंचायत कर्मचारी आणि युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

### वृक्षांचे संगोपनही तितकेच महत्त्वाचे

■ वृक्ष लागवड ही केवळ झाडे लावण्यापुरती मर्यादित नसून त्यांचे संगोपन आणि संवर्धन करणेही तितकेच आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने लावलेल्या वृक्षाची नियमित काळजी घेण्याचा संकल्प करावा. लोकसहभागामुळे उपक्रमात आपलेपणाची भावना निर्माण होते आणि वृक्षसंरक्षण अधिक प्रभावीपणे होऊ शकते, असे प्रतिपादन नायब तहसीलदार डॉ. आदमुलवाड यांनी केले.

### स्मृतिवृक्षाची संकल्पना रुजविण्याचे आवाहन

■ कुटुंबातील व्यक्तीच्या निधनानंतर त्यांच्या स्मरणार्थ किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याची परंपरा निर्माण झाली, तर लोकसहभागाची खरी भावना अधिक बळकट होईल, असे उपविभागीय अधिकारी होवाळे यांनी सांगितले.

## वसंतराव नाईकांचे कार्य ग्रामीण विकासासाठी प्रेरणादायी : चितांगराव कदम

प्रतिनिधी ५ जुलै




**उमरखेड** : हरितक्रांतीचे प्रणेते तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी आपल्या दूरदृष्टीतून महाराष्ट्राच्या विकासाचा भक्कम पाया रचला. रोजगार हमी योजना, एकाधिकार कापूस खरेदी योजना आणि अन्नधान्य उत्पादनातील स्वयंपूर्णतेमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा मिळाली, असे प्रतिपादन चितांगराव कदम यांनी केले.

स्मार्ट ग्रामपंचायत नागापूर (प.) येथे वसंतराव नाईक यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी विजय बेटेवाड होते. प्रारंभी कृषी दिनानिमित्त विळा व कणीस असलेल्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी उमरखेड तालुक्यातील रिक्त असलेल्या नऊ केंद्रांवर नियुक्त झालेल्या नव्या केंद्रप्रमुखांचा सत्कार करण्यात आला. डॉ. दीपक ढोक (कुपटी), स्वप्नील वारकड (मुळावा), माधव गौड (विडूळ), सचिन धोबे (साखरा), विजयकुमार राजूरवार (ब्राह्मणगाव), विनायक वानखेडे (ढाणकी), राजकुमार गायकवाड (जेवली), शंकर शिंदे (निंगनूर) आणि अमित दासरवार (कोरटा) यांचा गौरव करण्यात आला. आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त तरोडा केंद्राचे केंद्रप्रमुख आनंद देशमुख यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

गावातील गुणवंतांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत सहाय्यक विक्रीकर निरीक्षकपदी निवड झालेल्या रितेश जाधव, महाराष्ट्र पोलीस दलात निवड झालेल्या अर्चना जाधव तसेच सेंट्रल बँकेत अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या प्रिती जयंत कदम यांचा शाल, फेटा, पेन, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. नागापूर ग्रामपंचायतीचे पहिले सरपंच रामराव सोमला जाधव यांच्या कार्याचा यावेळी गौरव करण्यात आला. ग्रामपंचायतीचे सेवक स्वर्गीय दादाराव पाटील कुपटी यांनी ३० जून रोजी वयोमानानुसार सेवानिवृत्ती स्वीकारल्याने त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

कृषी दिनानिमित्त कृषी महाविद्यालय, कुपटी यांच्या वतीने संत गाडगेबाबा मोक्षधाम परिसरात लागवडीसाठी विविध प्रजातींची ४० झाडे ग्रामपंचायतीला देण्यात आली. 'वृक्ष लावण्यापेक्षा झाडे जगवूया' असा संकल्प उपस्थितांनी केला. तसेच पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सहा शेतकरी व शेतमजुरांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अंबादास कदम यांनी केले, तर आभार मुख्याध्यापक सतीश घोडके यांनी मानले. कार्यक्रमास माजी सभापती सविता कदम, सरपंच गोदाजी जाधव, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप जाधव यांच्यासह ग्रामस्थ, कर्मचारी, महिला, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला SIR चा आढावा

प्रतिनिधी ५जुलै

**यवतमाळ**:जिल्हाधिकारी विकास मीना यांनी नेर तालुक्याला भेट देऊन SIR अभियानाच्या अनुषंगाने सुरू असलेल्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी उपस्थित AERO, BLO सुपरवायझर तसेच BLO यांच्या कामकाजाची पाहणी करून विविध बाबींची माहिती घेतली. कामकाजाची गुणवत्ता, अचूकता आणि प्रगती याबाबत समाधानकारक काम करण्याच्या सूचना देत, निर्धारित मुदतीत सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यावर भर देण्यात आला. प्रलंबित बाबी तातडीने निकाली काढून कामात कोणताही विलंब होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

मागासवर्गीय एज्यूकेशन सोसायटी, पुसद व्दारा संचालित

### गुलाम नबी आझाद उर्दु अध्यापक विद्यालय, पुसद

(विना अनुदानित)

**पहिजेत**

अ.वि.कोड ६५०६ — एन.सी.टी.ई कोड ११२१३८

| अ.क्र. | पद | विषय | शैक्षणिक अर्हता | पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | स. शिक्षक | गणित | एम.एस.सी, एम.एड | ०१ |
| २ | स. शिक्षक | इंग्रजी ०१ समाज शास्त्र ०१ | एम.ए. एम.एड | ०२ |
| ३ | अंशकालीन शिक्षक | शारिरिक शिक्षक | एम.पी.एड. | ०१ |
| ४ | अंशकालीन शिक्षक | संगीत १ कला १ | संगीत विशारद फाईन आर्ट | ०२ ०१ |
| ५ | क. लिपिक | | पदवी, टंकलेखन मराठी, इंग्रजी | ०१ |
| ६ | तंत्रज्ञ | कॉम्प्युटर, आय.टी. | कॉम्प्युटर पदवी | ०१ |
| ७ | प्रयोग शाळा स. | | सायंस पदवी | ०१ |
| ८ | सेवक | | एच.एस.एस.सी | ०१ |

इच्छुक व पात्र उमेदवारांनी आपले अर्ज व रेझुम शैक्षणिक कागद पत्रासह, दि. १६/०७/२०२४ रोजी सकाळी ११.०० ते सांयकाळी ५.०० वाजे पर्यन्त कार्यालय, गुलाम नबी आझाद उर्दु अध्यापक विद्यालय, पुसद येथे सादर करावे.

अध्यक्ष/सचिव,
मागासवर्गीय एज्यूकेशन सोसायटी, पुसद
दि-०४/०७/२०२६

प्राचार्य,
गुलाम नबी आझाद उर्दू अध्यापक विद्यालय, पुसद

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय द्वारा ॲड राजेश शहा बिल्डींग (लाला बिल्डींग समोर ) अवधूतवाडी यवतमाळ ता. जि. यवतमाळ येथे प्रकाशित केले. ■ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ■ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135